महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
कोल्हापूर विभागीय मंडळ , राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

Website www.sscboardkohapur.in E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं / उ.मा. गोप/ 1019
कोल्हापूर - ४१६००४
दिनांक - ११/०७/ २०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा,सांगली,कोल्हापूर

**विषय - शैक्षणिक वर्षे २०२२-२३ पासून इ. १ ली ते इ. १२ वी चा पाठयक्रम १००% राबविणेबाबत.**
**संदर्भ** - राज्यमंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा -२/३१९२, पुणे दिनांक ०१/०७/२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, मार्च २०२० पासून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा ऑनलाईन स्वरूपामध्ये सुरु होत्या. तसेच प्रत्यक्ष शाळेत अध्ययन-अध्यापन मर्यादित स्वरूपात होत असल्याने कालावधीमध्ये विद्यार्थ्यावरील अध्ययनाचा ताण कमी व्हावा या दृष्टिने शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता १ ली ते १२ वी चा पाठयक्रम २५% कमी करण्यात आला होता.

परंतु शासन निर्णय क्रमांक अभ्यास -२०२२/प्र.क्र.१०४/एसडी-४ दिनांक २४ जून २०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इयत्ता १ ली ते १२ वी साठी १००% पाठयक्रम लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा १००% अभ्यासक्रमानुसार घेण्यात येणार आहे.

सदर बाब आपल्या स्तरावरून सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून दयावी

(दत्तात्रय पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव-
०१) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
०२) मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सातारा, सांगली व कोल्हापूर